### पशुप्रजनन रोजनिशीचे महत्त्व :

पशुपालकाने रोजच्या रोज पशुप्रजनन विषयक नोंद आपल्या रोजनिशीत करून वेळ मिळेल तसे त्याचे सिंहावलोकन करावे म्हणजे जनावरांतील समस्या त्याच्या नजरेस येतील व त्यांचे निवारण करण्यासाठी तो जागृत होईल.

### रोजनिशीत ठेवायच्या नोंदी :

- जनावर माजावर आल्याची तारीख व वेळ
- माजाचा सर्वसाधारण कालावधी
- कृत्रिम रेतनाची तारीख व वेळ
- वारंवार उलटणाऱ्या जनावरांच्या माजाच्या व रेतनाच्या वेळा व तारखा
- गर्भतपासणीची तारीख
- वेताची तारीख
- वेतानंतरची पहिली माजाची व रेतनाची तारीख

### पुशपालकाने घ्यावयाची काळजी :

- माज ओळखण्यासाठी दिवस रात्र जनावराचे निरीक्षण
- माजाची लक्षणे दाखवताच तज्ञ पशुवैद्यकास पाचारण करून योग्य वेळी रेतन करवून घेणे.
- रेतनानंतर ३ आठवड्यांनी माजाची लक्षणे न दाखवल्यास दीड ते दोन महिन्यांनी गर्भतपासणी करणे.
- जनावरे गाभण नसल्यास पुन्हा माजावर येण्यासाठी उपचार करणे.



### दरवर्षी एक वासरू कार्यक्रम :

प्रत्येक जनावराकडून वर्षाला एक वासरू अपेक्षीत आहे. त्यासाठी गाई-म्हशी व्याल्यानंतर दोन महिने उलटले की, पुन्हा गर्भधारणा करेपर्यंत सतत त्याचा पाठपुरावा पशुपालकाने केला तरच वर्षाकाठी एक वासरू ही संकल्पना साध्य होईल. अनेकदा हे साध्य न होण्याची प्रामख्याने दोनच कारणे आहेत.

**गाई-म्हशींचा माज बरोबर न ओळखणे व पालण पोषणाची कमतरता.**

पशुपालकामध्ये एक असा गैरसमज आहे की, गाई-म्हशीं वाल्यानंतर २ ते ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये दुग्धोत्पादन चांगले असल्यास माज दाखविला तरी रेतन केले जात नाही. पशुपालकानी हे लक्षात ठेवावे की, अशा वेळी रेतन केल्यास दुध तर कमी होत नाहीच उलट वर्षाला एक वासरू मिळवणे शक्य होते.




### गाई-म्हशींमधील दोष किंवा आजार :

अशा गाई-म्हशी वेगळ्या करून त्या पशुवैद्यकाकडून काटेकोर वंध्यत्व निवारण कार्यक्रमाअंतर्गत उपचार करून संबंधीत समस्यांचे निराकरण करावे.

वरील प्रकारे कृत्रिम रेतन तंत्राद्वारे गाई-म्हशीचे दुग्धोत्पादन वाढवून आर्थिक उन्नती साधता येणे सहज शक्य आहे.


संपादक व प्रकाशक
**डॉ. ला. रा. तांबडे**
कार्यक्रम समन्वयक

लेखक
**डॉ. प्रकाश कदम** — विषय विशेषज्ञ (पशुवैद्यक शास्त्र)
**डॉ. ला. रा. तांबडे** — कार्यक्रम समन्वयक

तांत्रिक साहाय्य
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशन वर्ष : २०११ ■ घडी पुस्तिका क्र. : ३ (एकूण घ.पु.क्र.२३)

# यशस्वी दुग्धव्यवसायासाठी गाई-म्हशीमध्ये कृत्रिम रेतन करा !




कार्यक्रम समन्वयक
**कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर**
सोलापूर-बार्शी रोड, मु. खेड, पो. केगाव,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र)
फोन : ०२१७ - २३५०३५९
Visit us at : www.kvksolapur.org

सौजन्य : कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), सोलापूर

## यशस्वी दुग्धव्यवसायासाठी गाई-म्हशीमध्ये कृत्रिम रेतन करा

### कृत्रिम रेतन पद्धतीचे उद्दिष्टे :

१. निकृष्ट प्रतिच्या गाईमध्ये जातीवंत सिद्ध वळूचे रेत वापरून चांगल्या प्रतिच्या गायी निर्माण करणे.

२. जातीवंत दुधाळू जातीच्या रेड्याचे रेत वापरून निकृष्ट जातीच्या म्हशीमध्ये सुधारणा करणे.

३. दुग्धोत्पादनात वाढ करणे.

४. गाई-म्हैशीच्या वेतातील अंतर कमी करणे तसेच दुग्ध उत्पादकता वाढविणे.

### कृत्रिम रेतनाचे फायदे :

१. जातीवंत वळूचा उपयोग जास्तीत जास्त प्रमाणात जास्ती काळापर्यंत करता येतो.

२. वळू व गाय-म्हैस यांचा प्रत्यक्ष संबंध येत नसल्यामुळे स्पर्शजन्य रोग व दुखापती टाळता येतात.

३. या पद्धतीने ६५ ते ८० टक्के जनावरे गाभण राहतात. भाकड काळ कमी करता येतो.

४. पंगू गाई म्हैशीवर सहजपणे गर्भधारणा करता येते.

"तुम्ही माझे गावठी बंधू, हा विचार पक्की मनी.
राखी बांधते आता, कृत्रिम रेतन हाच माझा धनी."




### कृत्रिम रेतनाची योग्य वेळ :

सर्वसाधारणपणे गाईचा माज १२ ते २४ तास व म्हशीचा माज २४ ते ३६ तास टिकतो. त्यानुसार योग्य वेळी रेतन करून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

| माजाचा कालावधी | गर्भधारेची शक्यता % |
|---|---|
| माजाच्या सुरुवातीस | ४४ % |
| माजाच्या मध्यास | ८२ % |
| माज संपत असताना | ७५ % |
| माज संपल्यानंतर ६ तासांनी | ६२ % |
| माज संपल्यानंतर १२ तासांनी | ३२ % |
| माज संपल्यानंतर २४ तासांनी | १२ % |
| माज संपल्यानंतर ४८ तासांनी | ० % |

वरील तक्त्यावरून आपल्या लक्षात येईल की, **माजाचा मध्य ते तो संपेपर्यंत रेतन केल्यास गर्भधारणेची शक्यता ही सर्वाधिक असते.** त्यासाठी पशुपालकानी खालीलप्रमाणे एक ठोकताळा आपल्या मनात ठेवावा.

| जनावर माजावर येण्याची वेळ | कृत्रिम रेतनाची वेळ |
|---|---|
| सकाळ | संध्याकाळ |
| दुपारी | रात्री उशिरा |
| संध्याकाळ | दुसऱ्या दिवशी सकाळ |
| रात्री उशिरा | दुसऱ्या दिवशी दुपार |



गर्भाशयात कृत्रिम रेतन करताना

वरीलप्रमाणे सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अशा तिन्हीही प्रहरी व रात्री उशिरा जनावरावर बारकाईने लक्ष ठेवल्यास माज ओळखणे सहज शक्य होते. **जनावराचा माज सुरू झाल्यानंतर सर्वसाधारणपणे १२ तासांनी (माजाचा मध्य) रेतन करावे.** रेतनानंतर तीन आठवड्यांनी पुन्हा माज न दाखविल्यास गर्भधारणेची शक्यता असते. म्हणून कमीत कमी दीड ते दोन महिन्यांनी तज्ञ पशुवैद्यकाकडून गर्भतपासणी करावी.




### वारंवार उलटणाऱ्या जनावरांची समस्या :

सर्व प्रथम पशुपालकाने हे लक्षात ठेवावे की, वारंवार उलटणाऱ्या गाई-म्हशींचे प्रमाण हे १२ ते १६ % इतके असते व एका गर्भधारणेसाठी साधारणपणे १.६ वेळा कृत्रिम रेतन करावे लागते. पुढे दिलेल्या उदाहरणावरून हे सहज लक्षात येण्यासारखे आहे.

योग्य रितीने पालन-पोषण केलेला १०० गाईचा गोठा असल्यास :

- पहिल्या रेतनाने १०० गाईपैकी ६० % गाई गाभण राहतील.
- दुसऱ्या रेतनाने ४० गाईपैकी २४ गाई गाभण राहतील.
- तिसऱ्या रेतनाने १६ गाईपैकी ९ गाई गाभण राहतील.
- चार किंवा अधिक रेतनाने राहिलेल्या ७ गाई गाभण राहतील.

९ + ७ = १६ % वारंवार उलटणाऱ्या गाईचे प्रमाण -

खरी समस्या आहे ती तीन किंवा अधिक वेळा (१६%) कृत्रिम रेतन कराव्या लागणाऱ्या गाई म्हशींची त्यासाठी पशुपालकाने जागरूक राहून आपल्या प्रत्येक जनावराची पशुप्रजनन विषयक नोंद रोजनिशीत करून दर १५ दिवसांनी पशुवैद्यकाकडून लैंगिक तपासणी करून असणाऱ्या समस्यांचे निराकरण करावे.